— : प्रेस नोट :— दिनांक— ०२/०२/२०१९

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. ७५/२०१४, कलम— ७,१३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८
विशेष खटला क्र. ८६/२०१५

**आरोपी — श्री. बळीराम रामचंद्र शिंदे** यांनी लाच स्विकारल्या प्रकरणी कारावास व दंडाची शिक्षा

यातील लोकसेवक अटक आरोपीने लोकसेवक पदाच्या नात्याने काम करतांना फिर्यादी यांचेकडुन घरबांधणी अग्रीम मंजूर करण्याकरीता प्रलोभन म्हणून कायदेशीर परिश्रमाखेरीज रु. २२,०००/— ची लाच मागून सापळा कारवाईदरम्यान त्यातील रु. २,०००/— कमी करुन रु. २०,०००/— ची मागणी करुन त्यातील रु. १०,०००/— स्विकारले म्हणून ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त आरोपी विरूध्द विशेष खटला क्र. ८६/२०१५ अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४५ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी विरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक ०२/०२/२०१९ रोजी मा. न्यायालयाने नमुद आरोपीस खालील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

कलम—७ भ्र.प्र.अधिनियम १९८८ मध्ये ३ वर्षे साधा कारावास व दंड रू. ५,०००/— दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास व कलम—१३(१)(ड) सह १३(२) भ्र. प्र. अधिनियम १९८८ मध्ये ४ वर्षे साधा कारावास व दंड रू. ५,०००/—, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. एन. बी. मिसाळ व पोलीस निरीक्षक श्री. वैभव मारकड यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. जे.व्ही. देसाई यांनी काम पाहिले.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क—लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

( एम. एन. मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
अपर पोलीस उप आयुक्त (अतिरिक्त कार्यभार)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner